# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १९/०५/२०२४ (रविवार)

---

## मोटरपंप चोरी करणारा आरोपी अटकेत

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील फिर्यादी नामे – विक्रम खुबचंद नानकामी वय ३९ वर्ष रा हषविला चौधरी चौक जरीपटका नागपुर यांनी रिपोर्ट दिला कि त्यांचे माहुरझरी शिवारात असलेल्या शेतातील विहीरीवर किर्लोस्कर कंपनीची पाण्याची मोटर कि १२,०००/–रू ची लावली होती. सदर पाण्याची मोटर ही कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक २३.१०.२३ चे २२.०० वा ते २४.१०.२३ चे ०६.०० वा दरम्यान चोरून नेली आहे. अश्या सदर फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर प्रकरणी कळमेश्वर येथील पोलीस स्टॉफ हे पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलीग करीत असतांना मुखबीर कडुन खबर मिळाली की, माहुरझरी येथे राहणारा संतोष वाडीवा हा रात्री दरम्यान शेतात जावुन मोटर पंप चोरी करतो, अशी खात्रीशीर माहीती वरुन माहुरूझरी येथुन संतोष वाडीवा रा माहुरझरी यास ताब्यात घेवुन त्याला बारकाईने विचारपूस केली असता त्याने मोटर पंप चोरी केल्याची गुन्ह्याची कबुली दिली व चोरीचा माल वाहुन नेण्याकरीता वापरलेली मोटर सायकल चा वापर करीत असल्याचे सांगीतले. आरोपी नामे– संतोष उर्फ शिवा मिंजा वाडीवा वय ३३ वर्ष रा. ग्राम शौतखेडा ता भिमापुर पोस्ट चुना हजुरी पोस्टे चिचोली जि. बैतुल (म प्र) ह.मु माहुरझरी यांचे कडुन एक मोटर सायकल कि ४०,०००/– रू ची हस्तगत करण्यात आली. तसेच आरोपीस दिनांक १८/०५/२४ रोजी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार श्री ठाकरे मो क्र ७९७२७२५४६० करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री योगेश कामाले, पोलीस हवालदार ठाकरे, पोलीस अंमलदार नुमान शेख यांचे पथकाने पार पाडली.

## लोखंडी पाईप चोरी करणारा आरोपीवर कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान येथील फिर्यादी नामे– ओमप्रकाश रामचंद्र पाल वय ५५ वर्ष रा न्यु टेकाडी कामठी तह पारशिवनी यांनी तोंडी रिपोर्ट दिला कि, वाकीटाकी टॉवर एरीया डब्लु सी. पुराना गोंडेगाव रोड, पारशिवनी येथे काही इसम चोरी करीत आहे. अश्या बातमीवरून पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस स्टॉफ पोहचला असता नमुद आरोपीस पकडुन विचारणा केली असता यातील आरोपी १) विकास उर्फ पिंटु छेदीलाल गुप रा.खदान न.६ कन्हान २) दिपक बडेलाल कश्यप रा. खदान न.६ कन्हान ३) सौरभ बिसुनदेव साहानी रा.खदान न.६ कन्हान ४) विजयबहादुर राममिलन कबिरदास रा. बिकानी, मंगलवारी काजीहोस, नागुपर, कन्हान हे आपले ३ चाकी ऑटोमध्ये लोखंडी पाईप ६ नग किंमत अंदाजे २०,०००/–रू चा चोरून नेतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन आरोपी एक ऑटो क्र. MH40/BZ-1877 किंमत ७५,०००/– रू, वजन काटा किंमत १०००/–रू असा एकुण ९६,०००/–रू चा माल मिळुन आल्याने नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३७९ भादवि अन्वयें गुन्हा दाखल करून तपासात आहे. सदर गुन्हयातील आरोपीस दिनांक १८.०५.२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन पुढील तपास सफौ भोजराज तांदुळकर मो क्र ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री पाटील, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, पो हवा उमाशंकर पटेल यांचे पथकाने पार पाडली.

## दुचाकी वाहन चोरी करणारा आरोपी अटकेत

पो स्टे कोंढाळी येथे फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर आनंदराव मदनकर वय २५ वर्ष रा दुधाळा यांनी रिपोर्ट दिला कि त्यांची मोटर सायकल क्र एम एच ४० सी आर ८४६१ कि ५०,०००/—रू ची कोणीतरी अज्ञात चोराने घरासमोरून दिनांक ५.५.२४ चे १२.०० ते ३.०० वा दरम्यान चोरून नेली आहे. अश्या रिपोर्टवरून खबरीद्वारे गुप्त माहीती काढली असता आरोपी नामे— आकाश सयाम रा मरामाय नगर, काटोल हा मोटर सायकल चोरी करून विकण्याचे काम करतो. अश्या माहीती वरून सदर आरोपी नामे — आकाश दिलीप सयाम वय २४ वर्ष रा.मरामाय नगर काटोल ता.काटोल जि.नागपुर यास ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता त्याने सदर मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितल्यावरून नमुद आरोपीस दिनांक १८.०५.२४ रोजी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोहवा/ गंगाधर ठाकरे पोस्टे कोंढाळी हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कोंढाळी येथील पोलीस निरीक्षक श्री राजकुमार त्रिपाठी व त्यांचे पथकाने केली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**